# महाराष्ट्र शासन

E-mail: **deskf10.rfd-mh@gov.in**

क्र.एफएलडी-१९२३/प्र.क्र.१३९/फ-१०
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक:- ०८ मे, २०२३

प्रति,

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, नागपूर

विषय:- वनजमिन-पुणे
पुणे रिंग रोडच्या कामासाठी पुणे जिल्ह्यातील ४८.५५ हे. वनजमीन वळती करण्याबाबत...

संदर्भ:- केंद्रस्थ अधिकारी यांचे पत्र क्र. कक्ष-१७/नोडल/पुणे/ID-१३७५२ (NH)/१६७/२०२३-२४, दि.१९.०४.२०२३.

विषयांकित प्रकरणी उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने खालील मुद्यांची माहिती शासनास सादर करावी:-

a) प्रस्तावित जमिनीमध्ये काही खाजगी वनजमिनीचा समावेश आहे. मौ. बेबड ओव्हळ येथील ग. नं. ३३ मधील एकूण क्षेत्र ६.७६ हे. आर इतके आहे. त्यापैकी ०.१७४९ हे. इतके क्षेत्र वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत वळतीकरणासाठी प्रस्तावित केले आहे. सदर ग. नं. ३३ मधील केवळ २.०५ हे. क्षेत्रास खाजगी वन जमीन म्हणून संबोधण्यात आले आहे. याव्यतिरिक्त गा. न. नं. ७/१२ मध्ये राज्यमार्ग (विशेष) क्र.१ करीता राखीव क्षेत्र ०.१७४९ हे. अशी सुध्दा स्वतंत्र नोंद आहे. त्यामुळे प्रस्तावित ०.१७४९ हे. क्षेत्र खाजगी वन म्हणून संबोधलेल्या २.०५ हे. क्षेत्रातीलच आहे किंवा कसे? याबाबत खात्री करण्यात यावी.

b) मौ. भरे येथील गट नं. ४०६/१/अ मधील सुमारे १२ हे. जमीन वन विभागाच्या नावे आहे. तर उर्वरित जमीन अन्य संस्थाना भोगवटादार वर्ग-२ या धारणाधिकारावर वाटप झालेली दिसते. प्रस्तावित जमीन केवळ वन विभागाच्या हिस्स्यातील आहे किंवा वाटप झालेल्या संस्थाच्या हिस्स्याची देखील आहे याचा बोध होत नाही. अन्य संस्थांच्या हिस्स्यातील जमीन असल्यास ती देखील वन (संवर्धन) अधिनियम,१९८० अंतर्गत केंद्र शासनाची मंजूरी घेण्यास पात्र आहे किंवा कसे? याबाबत खात्री करण्यात यावी.

c) मौ. थोपटेवाडी येथील गट नं. १३६, १३७ मधील जमिनीच्या ७/१२ मध्ये भोगवटादार वर्ग-२, राखीव वन, खाजगी वन, सिलिंग कायदा अशा प्रकारच्या भिन्न भिन्न नोंदी आहेत. उपवनसंरक्षक यांनी राखीव वन म्हणून जमीन वळतीकरणासाठी प्रस्तावित केली आहे. त्यामुळे सदर जमिनीचा वैधानिक दर्जा नेमका राखीव वन म्हणून गृहित धरावा की खाजगी वन म्हणून गृहित धरावा याबाबत उपवनसंरक्षक यांना विचारणा करण्यात यावी.

d) मौ. थोपटेवाडी येथील गट नं. १५६, १५७, १५८,१५९ मधील जमिनीच्या ७/१२ मध्ये भोगवटादार वर्ग-१ व संपूर्णपणे खाजगी व्यक्तींची नावे आहेत. उपवनसंरक्षक यांनी राखीव वन म्हणून जमीन वळतीकरणासाठी प्रस्तावित केली आहे. सबब, सदर जमीन राखीव वन असल्याचा पुरावा म्हणून आवश्यक कागदपत्रे सादर करण्याबाबत उपवनसंरक्षक यांना कळविण्यात यावे.

e) मौ. थोपटेवाडी येथील गट नं. १५५ मधील जमिनीच्या ७/१२ मध्ये भोगवटादार वर्ग-१ व खाजगी व्यक्तीचे नाव नमूद आहे. उपवनसंरक्षक यांनी खाजगी वन म्हणून जमीन वळतीकरणासाठी प्रस्तावित केली आहे. ७/१२ उता-यावर खाजगी वनासंबंधी कोणतीही नोंद नाही. सबब, सदर जमीन खाजगी वन असल्याची खात्री करण्याबाबत उपवनसंरक्षक यांना कळविण्यात यावे.

f) मौ. मोरदरवाडी येथील ग. नं. २५१ मधील एकूण क्षेत्र १.९७ हे. आर इतके आहे. त्यापैकी ०.३२१४ हे. इतके क्षेत्र वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत वळतीकरणासाठी प्रस्तावित केले आहे. सदर ग. नं. २५१ मधील केवळ ०.१६.७५ हे. आर क्षेत्रास खाजगी वन जमीन म्हणून संबोधण्यात आले आहे. त्यामुळे प्रस्तावित ०.३२१४ हे. क्षेत्र खाजगी वन म्हणून संबोधलेल्या ०.१६.७५ हे. आर क्षेत्रातीलच आहे किंवा कसे? याबाबत खात्री करण्यात यावी.

g) मौ. मोरदरवाडी येथील ग. नं. ३४८ मधील एकूण क्षेत्र ५.२४ हे. आर इतके आहे. त्यापैकी ०.५१७७ हे. इतके क्षेत्र वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत वळतीकरणासाठी प्रस्तावित केले आहे. सदर ग. नं. मधील २.५८ हे. आर क्षेत्रास खाजगी वन जमीन म्हणून संबोधण्यात आले आहे. त्यामुळे प्रस्तावित ०.५१७७ हे. क्षेत्र खाजगी वन म्हणून संबोधलेल्या २.५८ हे. आर क्षेत्रातीलच आहे किंवा सदर ग. नं. मधील संपूर्ण क्षेत्रालाच वन (संवर्धन) अधिनियम, १९८० च्या तरतूदी लागू होतात? याबाबत उपवनसंरक्षक यांच्याकडून माहिती घेण्यात यावी.

h) थोपटेवाडी येथील ग. नं. २४२, मोरदरवाडी येथील ग. नं. ४६५, मारणेवाडी येथील ग. नं. ३४१, मौ. भरे येथील ग. नं. ४०६/२/१/२, पाचणे येथील ग. नं. ९२१ व बेबड

ओहळ येथील ग. नं. ४५ मधील प्रस्तावित जमिनीचे ७/१२ उतारे अप्राप्त आहेत. सदर उतारे सादर करण्याबाबत संबंधितांना कळविण्यात यावे.

i) पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित जमिनीचे ७/१२ उतारे व १० वर्षांची पर्यायी वनीकरण योजना सादर करावी.

j) उपवनसंरक्षक यांनी स्थळ पाहणी अहवालात वन्यप्राणी दिसून येतात, असे नमूद केले आहे. मात्र, वन्यजीव मंजूरी अथवा उपशमन योजनांची आवश्यकता राहील किंवा कसे याबाबत भाष्य केलेले नाही. याबाबत प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांचे अभिप्राय घेऊन, माहिती सादर करावी.

(गणेश जाधव)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन